| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्र. ०२/२०१५**<br>**विश्वजीत चेवले व इतर वि. केवलबाई चेवले**<br>**<u>आदेश निशाणी ४३ वर</u>**<br>**MHLA130005812014** |

**१.** प्रस्तुत अर्ज हा वादीने मयत प्रतिवादी चे विरूध्द पारीत करण्यात आलेला दावा अबेटमेंट आदेश रददबातल होण्यासाठी केला आहे. प्रतीवादीचे विधिज्ञामार्फत प्रस्तूत अर्जास हरकत घेण्यात आली. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी हे दि.२१/०८/२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयताचे वारस अभिलेखावर आणणसाठी ९० दिवसाच्या आत अर्ज करता आला नाही व दावा अबेट झाला आहे. दाव्याचा अंतीमत: आणि गुणवत्तेवर निकाल होण्यासाठी मयत प्रतिवादी चे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे कारण दाव्यातील त्याची मागणी टिकून आहे.

**३.** प्रतिवादी यांचे विधिज्ञ यांनी त्यांचे प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे म्हणणे मांडुन प्रतिवादी मार्फत हरकत घेतली आहे. प्रतिवादी चे विधिज्ञ यांचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुत प्रकरणात मयत प्रतिवादी केवळबाई ज्ञानोबा चेवले हिचे पती ज्ञानोबा नामदेव चेवले हे जिवंत आहेत त्यामुळे त्याना दाव्यात वारस करणे आवश्यक आहे. तसेच प्रतिवादी यांची मुलगी हिरकनबाई हीसही वारस म्हणुन पाटी करणे आवश्यक आहे.

**४.** वादींतर्फे प्रस्तुत अर्जासोबत शपथपत्र दिले आहेत. अर्जांतील वर नमुद कारणांचा विचार करता मयत वादींचे वारस अभिलेखावर आणणेसाठी जाणिवपुर्वक विलंब केल्याचे दिसुन येत नाही. अश्या परीस्थितीत प्रतिवादी चे वारस अभिलेखावर येउन या दाव्यात गुणवत्तेवर निकाल होण्यासाठी त्यांना संधी देणे न्यायोचित होणार आहे. अर्जातील कारणांचा विचार केला असता वादीने सांगितलेले कारण संयुक्तीक

वाटते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस पात्र आहेत. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी क्र.४३ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी चा दावा अबेटमेंट रद्य करण्यात येते.

३. अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

एस.डी.

दिनांक २०/०१/२०२४ **के.के.वाघमारे**

**रेणापूर** **सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**रेणापूर**